महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक विकास मंडळ संचालित

# महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय चाळीसगाव (जळगाव)

प्रथम वर्ष २०२१-२२

विषय :- EPC-3 Reading And Reflecting On Texts

प्रात्यक्षिकाचे नांव :- महात्मा ज्योतिराव फुले (चरित्र)

विद्यार्थ्याचे नांव :- पवार स्नेहल विनायक

रोल नं. :- 76

मार्गदर्शक प्राध्यापकाचे नांव :- प्रा. शामली शेरात मॅडम

# महात्मा जोतीराव फुले

धनंजय कीर



www.youvaworld.com

Date : Page :

Topic :

# महात्मा जोतीराव फुले

## आमच्या समाजक्रांतीचे जनक

लेखकाचे नाव - धनंजय कीर

प्रकाशकाचे नाव व ठिकाण - अस्मिता मोहिते
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३०१, महालक्ष्मी चेंबर्स
२२, भुलाभाई देसाई रोड
मुंबई ४०० ०२६

पृष्ठ संख्या - ३६४

पुस्तकाचे प्रकार - चरित्र

आवृत्ती - पहिली आवृत्ती - १९६८ / १८८९
चौथी आवृत्ती - १९९२ / १९१३
पाचवी आवृत्ती - २०१२ / १९३४

# अनुक्रमणिका


| अ.क्र | अनुक्रमणिका | पेज नं. |
|---|---|---|
| 1 | पुस्तकाबद्दल थोडे मत | 1 |
| २ | प्रस्तावना | 2 |
| 3 | पुस्तकाचे मुखपृष्ठ | 5 |
| 4 | पुस्तकाचा सारांश | 6 |
| 5 | A) बालपण आणि शिक्षण | |
| | B) शैक्षणिक कार्य | |
| | C) सामाजिक कार्य | |
| 5) | पुस्तकाचे वैशिष्ट्ये | 11 |
| 6 | वैयक्तिक मत | 13 |
| 7 | समारोप | 14 |


Sundaram®

FOR EDUCATIONAL USE

www.youvaworld.com



## या पुस्तकाबद्दल थोडे -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची इच्छा पूर्ण करण्याच्या उद्देशाने धनंजय कीर यांनी महात्मा जोतीराव फुले यांचे चरित्र लिहिले. शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांचे हक्क आणि स्वातंत्र्य यासाठी झगडणाऱ्या या आद्य धर्मसुधारकाला बाबासाहेब आंबेडकर आपला गुरू मानत असत. बाबासाहेबांप्रमाणेच जोतीबा फुले यांच्या कार्याचा गौरव महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, न्यायमूर्ती रानडे या पुढील काळातील समाजसुधारकांनीही केला आहे.

काळाच्या पुढचा विचार करून जे सत्य आणि न्याय्य आहे, त्यासाठी प्रसंगी प्राणांची बाजी लावणाऱ्या या युगपुरुषाचे चरित्र धनंजय कीर यांनी प्रथम इंग्रजीतून आणि नंतर मराठीतून लिहिले. चरित्रनायकावर केवळ स्तुतिसुमनांचा वर्षाव न करता त्यांच्या कार्याचे समग्र आणि योग्य दर्शन वाचकांनाही घडवणे हे कीर यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य चरित्र वाचतानाही जाणवते. १९६८ साली प्रथम प्रकाशित झालेल्या या ग्रंथाच्या चार आवृत्त्या आणि प्रत्येक आवृत्तीची अनेक पुनर्मुद्रणे आजवर प्रसिद्ध झाली. फार सनावळ्या न देता देखील चरित्र अभ्यासपूर्ण करण्याची हातोटी कीरांजवळ होती. तरीही अभ्यासकांच्या दृष्टीने असलेले सनावळीचे महत्त्व लक्षात घेऊन इतर चरित्रांप्रमाणेच यातही महात्मा जोतीराव फुले यांचा जीवनपट समाविष्ट केला आहे.

# प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांचे चरित्र मी लिहित असताना एका भेटीच्या प्रसंगी, महात्मा फुले यांचे चरित्र लिहिण्याचा आपला मानस आहे, असे बाबासाहेबांनी मला सांगितले. परंतु आपली प्रकृती ढासळत असल्यामुळे ते कार्य आपल्या हातून सिद्धीस जाईल किंवा नाही अशी त्यांनी शंका प्रदर्शित केली. त्यावर मी स्वयंस्फूर्तीने उत्तरलो, 'बाबासाहेब, ते कार्य आपणा कडून शकला नाहीतर तर मी ते तडीस नेण्याचा प्रयत्न करीन.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे, भगवान बुद्ध व महात्मा कबीर त्या आपल्या दोन गुरूंच्या बरोबरीने महात्मा फुले त्यांना आपले तिसरे गुरू मानीत. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे ते संकल्पित कार्य नि उत्कट इच्छा ही मी यथामती नि यथाशक्ती पुर्ण केली त्याविषयी मला कृतार्थता वाटते

अस्पृश्य, आदिवासी नि अनाभिगम्य समजल्या जाणाऱ्या अतिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा काढणारा पहिला भारतीय, आधुनिक भारतातील स्त्रीशिक्षणाचा जनक, भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य त्यांचा उद्गाता, शेतकरी व कामगार त्यांची दुःखे नि दारिद्र्य निवारण्यासाठी चळवळ उभारणारा पहिला पुढारी, जातिभेद संस्थेवर कडाडून हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारा पहिला, लोकांत, सामान्य जनतेच्या दुःखाला अन् दैन्याला वाचा फोडणारा पहिला महात्मा आणि सत्यमेव जयते त्या दिव्य तत्वाने भारून गेलेला खरा सत्यशोधक अशा त्या नरोत्तमास महात्मा गांधीनी खरा महात्मा म्हणून गौरवावे, वीर सावरकरांनी समाजक्रांतिकारक म्हणून प्रशंसावे, भारतभूषण

डॉ. आंबेडकरांनी गुरु मानून त्यांचा जयजयकार करावा आणि न्यायमूर्ती रानडे यांनी त्यांचे सत्कार्य ध्यावे यावरूनच जोतीरावांच्या ऐतिहासिक भूमिकेची सार्थकता व श्रेष्ठता पटण्यासारखी आहे.

सुशिक्षित पण स्वार्थी अशा वरिष्ठ वर्गानी जोतीरावांच्या विरुध्द त्या काळी विलक्षण ओरड केली. त्यांच्या पायाखालची वाळू आता घसरली आहे. सर्व राष्ट्राने आता जोतीरावांचा, सामान्य जनतेच्या युगाचा प्रेषित अन् समाज-क्रांतिकारक म्हणून गौरव केला आहे.

जोतीरावांनी ब्राम्हणीधर्माच्या स्वार्थी तत्त्वांवर जो हल्ला चढविला तो अचूक नि अजोड होता. ब्राम्हणीधर्माची परिणती सामाजिक, धार्मिक नि आर्थिक विषमतेत होऊन समाज-व्यवस्थेत ब्राम्हणांना प्रतिष्ठा, सत्ता नि देवपण प्राप्त झाले होते. त्यांच्या सत्तेचे मूळ त्यांच्या स्मृती, श्रुती नि पुराणे यात होते हे जाणून त्यांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाची मुक्तता करण्यासाठी त्यांवर जोतीरावांनी हल्ला चढविला आणि सामाजिक न्याय, बुध्दिप्रामाण्य व मानवी समानता ह्या तत्त्वांवर समाजाची उभारणी करण्यासाठी लढा केला.

ब्राम्हणीधर्माचे नि ग्रंथांचे खरे अंतरंग एकट्या जोतीरावांनीच उघडे केले असे नव्हे, तर त्यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंद त्यांच्यासारख्यांनीही प्रत्यक्ष आधार दाखवून ते स्पष्ट केले. स्वामी विवेकानंद त्यांनी म्हटले आहे: 'जेव्हा जेव्हा ब्राम्हणांनी ग्रंथ लिहिले तेव्हा तेव्हा त्यांनी दुसऱ्यांना सर्व अधिकार नाकारले आणि व्यासाने तर गरिब-शूद्रांना ठकविण्यासाठी वेदांचा दिशाभूल करणारा अर्थ लावला.

जोतीरावांचे तत्त्वज्ञान मानवाची प्रतिष्ठा, धार्मिक सहिष्णुता, मानवी हक्क, मानवी समानता यांचा संदेश देत राहिले आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ह्या ग्रंथानंतर भारताच्या ध्येयांचे, भूतकालातील घटनांचे नि तत्त्वांचे संशोधन सुरू होऊन आता आत्मनिरिक्षण, तत्त्वचिकित्सा आणि मूल्यमापन ह्यांद्वारा नवमंथन सुरू झाले आहे. त्या संदर्भात जोतीरावांच्या कार्याचा अभ्यास होणे योग्य आहे.

## पुस्तकाचे मुखपृष्ठ –

कोणत्याही पुस्तकाचे परिक्षण करतांना पुस्तकाचे बाह्यपरिक्षणामध्ये मुखपृष्ठ हा भागही महत्त्वाचा मानला जातो. कोणताही वाचक पुस्तक उघडून पाहण्याआधी पुस्तकाचे मुखपृष्ठ आधी पाहतो. मुखपृष्ठ उत्कृष्ट असेल तर वाचक त्या पुस्तकाकडे आकर्षित होतो. धनंजय कीर लिखित महात्मा जोतिराव फुले या चरित्र पुस्तकाचे मुखपृष्ठ ही उत्कृष्ट आहे. क्रांतीवीर महात्मा फुले यांचा सुस्पष्ट फोटो मुखपृष्ठावर आहे. मुखपृष्ठाचा पृष्ठही उत्तम दर्जाचा आहे

## पुस्तकाचा सारांश -

जोतीराव गोविंदराव फुले (११ एप्रिल १८२७ - २८ नोव्हेंबर १८९०), महात्मा फुले नावाने लोकप्रिय, हे महाराष्ट्रातील भारतीय सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जाति-विरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. अस्पृश्यता, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, स्त्रियांना आणि मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे अशा अनेक क्षेत्रामध्ये त्यांनी कार्य केले. महात्मा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे दोघे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. जोतिरावांनी १८४८ मध्ये पुण्यात तात्यासाहेब भिडे यांच्या निवासस्थानी किंवा भिडेवाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. खालच्या जातीतील लोकांना समान हक्क मिळवुन देण्यासाठी त्यांनी आपल्या अनुयायांसह सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शोषित वर्गांच्या उत्थानासाठी कार्य करणाऱ्या या संघटनेचे भाग सर्व धर्म आणि जातीचे लोक बनू शकत होते. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महाराष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव कृष्णाजी वंडेकर यांनी सन्माननीय महात्मा पदवी प्रदान केली होती.

महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र' असे म्हणतात.

'शेतकऱ्यांचे आसूड' हा महात्मा फुले यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णियांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया महात्मा फुले यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक

व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे.

## बालपण आणि शिक्षण -

जोतीराव गोविंदराव फुले (११ एप्रिल १८२७- २८ नोव्हेंबर १८९०) महात्मा फुले, नावाने लोकप्रिय, हे महाराष्ट्रातील भारतीय सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. अस्पृश्यता जातिव्यवस्थेचे निर्मूलन, स्त्रियांना आणि मागास जातींच्या लोकांना शिक्षण देण्याचे अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी कार्य केले.

महात्मा जोतीराव फुले टोपणनाव: जोतीबा त्यांचा जन्म ११ एप्रिल, १८२७ कटगुण, व मृत्यू २८ नोव्हेंबर, १८९०) वय ६३, पुणे, महाराष्ट्र संघटना: सत्यशोधक समाज- प्रमुख स्मारके: भिडे वाडा, गंज पेठ, पुणे धर्म: हिंदू प्रभाव: थॉमस पेन आणि शिवाजी महाराज.

महात्मा फुले यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव शेरीबा फुले आई चिमणाबाई फुले पत्नी सावित्रीबाई फुले अपत्ये: यशवंत फुले (दत्तक) महात्मा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे दोघे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. जोतिरावांनी १८४८ मध्ये पुण्यात तात्यासाहेब भिडे यांच्या निवासस्थानी किंवा भिडेवाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. खालच्या जातीतील लोकांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी आपल्या अनुयायांसह सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शोषित वर्गाच्या उत्थानासाठी कार्य करणाऱ्या या संघटनेचे भाग सर्व धर्म आणि जातीचे लोक बनू शकत होते. महाराष्ट्रातील

सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून फुले यांची ओळख आहे. त्यांनी १८८८ मध्ये महाराष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव कृष्णाजी वंडेकर यांनी सन्माननीय महात्मा पदवी प्रदान केली होती.

महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास "फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र" असे म्हणतात.

जोतिराव फुले यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी जोतीराव यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते, त्यामुळे गोरे हे त्यांचे हे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रूढ झाले. कटगुणाहून त्यांचा परिवार पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आला. तेथे घर असून, त्यांच्या नावे सातबाराचा उतारा आहे खानवडी येथे फुले आडनावाची बरीच कुटुंबे आहेत.

## शैक्षणिक कार्य -

भिडे वाडा, बुधवार पेठ, पुणे येथेच १ जानेवारी १८४८ रोजी फुले दांपत्यांनी मुलींची शाळा सुरू केली होती. महात्मा फुले यांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या खालील ओळी प्रसिद्ध आहेत.

विद्येविना मती गेली।
मतीविना नीती गेली।
नीतीविना गती गेली।
गतीविना वित्त गेले,
वित्तविना शूद्र खचले

इतके अनर्थ एका अविद्येने केले ॥

बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी सावित्रीबाईंवर सोपवली आणि यानंतर जोतीबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. महात्मा फुलेंनी शिक्षणाची प्रेरणा अहमदनगरच्या मिस फरार यांच्याकडून घेतली होती. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्याच त्याच बरोबर अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केलीत. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. जोतीराव जसे सार्वजनिक ठिकाणी उपदेशपर भाषणे करीत, तसेच ते शाळेतील शिक्षकांना आदर्श पाठ देऊन 'शिक्षकांनी मुलांच्या हिताच्या दृष्टीने योग्य ती साधनेनी उपकरणे वापरावी म्हणून शिक्षकांनी नाही उत्तेजन देत असत. स्थापत्यशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे सत्यशोधक समाजाने एक अर्ज केला. त्या महाविद्यालयामध्ये काही प्रमाणपत्र गरीब ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना निःशुल्क शिक्षण द्यावे, अशी त्यांनी प्रार्थना केली होती. त्या अर्जातील त्यांचा हेतु सफल झाला.

सामाजिक कार्य :-

मानवी हक्कावर इ.स. १७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबाबत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण

आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींच्या शिक्षणा
यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव
त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि
अनुमान होते.

• कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही
आणि चातुर्वर्ण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे!
असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती
करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची विचार-
सरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे
मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्याचा आसूड या पुस्तका-
तून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची
वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टीकोनाचा
क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. 'नीति हाच
मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतीराव
एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक
प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड इ. ग्रंथ लिहून सामा-
जिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून
विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारचा
वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे हे ज्योतीराव
फुलेंनी आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' संहितेत अनेक वच-
नांच्या आधारे मांडली आहे. त्यातील काही महत्त्वाची वचने
लिहिली.

www.youvaworld.com



## वैशिष्ट्ये -

धनंजय कीर लिखित महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक या पुस्तकाचे प्रकट वाचन केल्यानंतर समजले. एका महान समाज क्रांतिकारक, शिक्षण क्रांतिकारक, महापुरुषाचा परिचय झाला. महात्मा जोतीराव फुले हे भारताचे शिक्षणाचे आद्य-क्रांतिकारक होते. आणि या अशा महान पुरुषाची संघर्ष गाथा धनंजय कीर या लेखकाने प्रभावीपणे या पुस्तकात अधोरेखित केली आहे. वाचकाला हे पुस्तक संपूर्ण वाचल्या-शिवाय सोडवत नाही. वाचकांना हे पुस्तक बांधून ठेवते. वाचक तल्लीन होऊन महात्मा जोतीराव फुले यांच्या संघर्ष गाथेत गुंतत जातो. माझ्या या पुस्तकाच्या वाचना-तून अनेक खालील वैशिष्ट्ये दिसून आलीत.

१) संपूर्ण जीवनकथा / जीवनगाथा या पुस्तकाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे या पुस्तकात महात्मा फुले यांचे जिवन चरित्राचे वर्णन केले आहे. अगदी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत महात्मा फुलेंच्या जिवनाचे यथार्थ वर्णन केले आहे. महात्मा फुले यांच्या जीवनातले बालपणाचे संघर्षाचे यथार्थ वर्णन लेखकाने केले आहे. म्हणून महात्मा फुले यांच्या जीवनाची संपूर्ण माहिती या पुस्त-कातून मिळते. हे पुस्तक वाचल्यानंतर कोणत्याही आत्म-चरित्र वाचण्याची आवश्यकता वाचकाला वाटत नाही. लेखकाने हे पुस्तक लिहितांना ~~[illegible]~~ तटस्थपणे आपली भूमिका मांडली आहे. व्यक्ती निष्ठा डोळ्यासमोर न ठेवता या पुस्तकाचे लिखाण केले आहे.

२) भाषाशैली - धनंजय ~~[illegible]~~ कीर यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची भाषाशैली सहज व सोपी असते भाषेत

कोणताही अवजडपणा नसतो. या पुस्तकातली भाषाशैली ही वाचकांना पटेल, रुचेल, समजेल अशी आहे. अगदी सामान्य वाचकांना समजणारी या पुस्तकातली भाषाशैली आहे. वाचतांना महात्मा जोतीराव फुले यांचे जीवन-प्रसंग आपल्या डोळ्यासमोर उभे राहावे इतकी सुंदर भाषाशैली या पुस्तकातली दिसून आली.

३) या पुस्तकातल्या सर्वसामान्यांना महात्मा फुलेंचा परिचय :-

धनंजय कीर लिखित या पुस्तकाच्या आजवर ३४ पेक्षा जास्त आवृत्त्या निघाल्या आहेत. महात्मा फुले यांच्या जीवन चरित्राचे संपूर्ण वर्णन या पुस्तकात आहे. म्हणून मराठी माणसाला किंवा मराठी वाचकाला महात्मा फुले यांच्या जीवनाचा परिचय या पुस्तकातून होतो. त्यांच्या कार्याची, योगदानाची सखोल माहिती व प्रेरणा या येणाऱ्या पिढीला मिळते हे पुस्तक वाचल्याने महात्मा फुले कोण होते हा प्रश्नच निर्माण होत नाही. म्हणून या पुस्तकातून महात्मा फुलेंचा जीवनप्रवास येणाऱ्या पिढीला सहज लाभतो म्हणून हे सुद्धा या पुस्तकाचे महत्त्वपूर्ण गोष्ट / वैशिष्ट्ये आहेत.

४) पुस्तकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, कागद, छपाई उत्तम आहे:-

कोणत्याही पुस्तकाचे दोन भाग असतात एक म्हणजे बाह्य रंग व दुसरे म्हणजे अंतरंग. बाह्यरंगामध्ये मलपृष्ठ, मुखपृष्ठ, कागद हे भाग येतात. तर अंतरंगामध्ये शब्द मांडणी, भाषाशैली आशय हे भाग येत असतो यासर्व बाबींचा विचार केला तर या पुस्तकाचे बाह्यरंग व अंतरंग उत्कृष्ट आहे. पुस्तकातली छपाई चांगली आहे शब्दांचा आकार व्यवस्थित दिला आहे. हे वैशिष्ट्य आहेत.

## वैयक्तिक मत :-

महात्मा फुले ' महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक ' या पुस्तकाचे प्रकट वाचन करून महात्मा फुले यांच्या संपूर्ण जीवन प्रवासाचे वर्णन समजले. महात्मा फुले हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताच्या शिक्षण व्यवस्थेला दिशा देणारे महापुरुष आहेत. खऱ्या अर्थाने भारतात शिक्षणाचा पाया महात्मा फुले यांनी रोवला. धनंजय किर या लेखकाने महात्मा फुले यांचा जिवन प्रवास अगदी सहज व सोप्या भाषेतून मांडला. म्हणून वाचकांना महात्मा फुले यांच्या जिवनाचा परिचय झाला. हे पुस्तक वाचून महात्मा फुले यांच्या सामाजिक शैक्षणिक जाणिवा समजण्यास मदत झाली हे पुस्तक वाचतांना उभेहुब महात्मा फुले यांचा जिवन प्रवास उभा राहतो. इतक्या सुंदर प्रासंगिक, शाब्दीक वर्णनातून महात्मा फुले यांचे चरित्र लिहले गेले आहे. लेखकाने व्यक्ती निष्ठेला बळी न पडता, वस्तू निष्ठा किंवा तटस्थपणे महात्मा फुलेंचे चरित्र लिहले आहे. एकंदरित महात्मा फुले या महान मानवाचे जिवन दर्शन यापुस्तकातून झाले. त्यांच्या जिवनातल्या अनेक छटा वैशिष्ट्ये समजले. म्हणून धनंजय किर लिखित महात्मा फुले यांचे चरित्र हे शाळेतल्या प्रत्येक शिक्षकांनी वाचले पाहिजे आणि विद्यार्थ्यांना हि हे पुस्तक वाचायला भाग पाडावे. तर येणाऱ्या पिढीला महात्मा फुले यांचे कार्य कळेल. व महात्मा फुले यांची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळेल म्हणून या प्रकल्पासाठी किंवा पुस्तक परिक्षणासाठी मी निवडलेले पुस्तक योग्य होते याची प्रचीती मला आली आणि अजून महात्मा फुले समजून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली.

# समारोप

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाअंतर्गत या प्रात्यक्षिकासाठी 'महात्मा जोतीराव फुले' यांचे चरित्र या घटकावर प्रात्यक्षिक केले. यामध्ये महात्मा जोतीराव फुले यांच्या चरित्रातील त्यांचे बालपण आणि शिक्षण, शैक्षणिक कार्य, सामाजिक कार्य. या प्रात्यक्षिकाद्वारे मला महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांची व विविध घटकांची माहिती मिळाली.

महात्मा जोतीराव फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा अभ्यासायला मिळाले. हे प्रात्यक्षिक करतांना प्रा. शामली थोरात मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. या प्रात्यक्षिकामुळे विद्यापीठाअंतर्गत महात्मा जोतीराव फुले यांचे चरित्र अभ्यासायला मिळाले हा प्रात्यक्षिक अविस्मरणीय होता.